**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.org

**: संपादिका :**

**सुहासिनी कीर्तिकर**

**: कार्यकारी संपादकमंडळ :**

**मिनाक्षी जयकर**
**मयुरा नायक**
**संजना कोठारे**
**वैजयंती कीर्तिकर**

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८८ वे) प्रभुतरुण मुंबई, शुक्रवार, ता. १६ माहे मार्च, सन २०१२ (अंक ९९०**


*संपादकीय*

## आनंदाचे संमेलन

**—सुहासिनी कीर्तिकर**

रवीन्द्र पिंगे, प्रवीण दवणे यासारखे लेखक जगण्याचे एक पाऊल टाकले की एक लेख तयार करतात. नवीन अनुभव घेतला की त्यांचा एक स्वतंत्र लेख प्रकाशित करत प्रकाशमान व्हायचे, हा त्यांचा 'मराठी बाणा'! पिंगे आता नाहीत म्हणा! तरीही इतर अनेकांच्या बाबतीत असेच घडताना दिसते. मी याला अपवाद कशी बरं? दरवर्षी 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' भरते. दरवर्षी मला त्याची वारी घडते. 'प्रभुतरुणा'च्या वाचकांना दरवर्षी या वारीतला माझा अनुभव प्रसादासारखा मी वाटून देते.

यावर्षी या अनुभवात वेगळा लाह्याप्रसाद आहे अन् आगळा आनंदही. महामंडळातर्फे भरणाऱ्या या संमेलनात गेल्या वर्षीपासून महामंडळाचे 'अक्षरयात्रा' हे वार्षिक प्रकाशित करण्याचा चांगला पायंडा पडलाय. या 'अक्षरयात्रा'ची मी काही वर्षे संपादकही होते. पण हे वार्षिक तेव्हा महामंडळाच्या वर्धापनदिनीच प्रकाशित व्हायचे. संग्रही ठेवण्याजोगे, संदर्भमूल्य असलेले हे समीक्षापर वार्षिक लाखो लोकांपर्यंत मग पोहोचायचेच नाही. संमेलनात प्रसिद्ध झाल्याने एका चांगल्या वार्षिकाला उदंड प्रतिसाद लाभला. या वेळच्या अंकात 'ललित निबंध' हा वाङ्मयप्रकार घेतलेला आहे. 'आत्मपर ललित निबंध' वर माझा विवेचनात्मक निबंध आहे त्यात. संमेलनात प्रसिद्ध झाल्याने माझ्या आनंदात किती भर पडावी? अहो, चक्क पंधरा फोन अन् सहा पत्रे आली मला जाणत्यांची. अक्षरशः 'अखिल भारतीय' पातळीवरून! मिरज, औरंगाबाद, कोलकाता, गुलबर्गा, गोवा, वर्धा अशा-अशा ठिकाणां-वरून. छाऽऽन वाटलं!

असं 'छाऽऽन वाटणं' तसं अनेक अंगांनी भेटायला आलं मला. संमेलनपूर्व संमेलनं असतात तशी माझी संमेलनोत्तर संमेलनही रंगली नं! 'ताडोबाचं जंगल' अनेक मनुष्य प्राण्यांसारखं आम्हीही पाहिलं. पण प्राण्यांमधून उत्क्रान्त होऊन नराचा नारायण होण्यातली दिव्यभव्यता मी पाहिली, भोगली ती आमट्यांच्या 'आनंदवना'ला भेट देऊन. सहाशे एकर जमिनीत साडेचार हजार कुष्ठरोगी, अंध, अपंगांनी उभारलेलं हे आनंदवन म्हणजे बाबा आमट्यांचा पृथ्वीतलावरील मानवाच्या श्रेष्ठत्वाचा साक्षात्कार आहे. स्वतंत्र ग्रामपंचायत, हातमागाचे-विटांचे कारखाने, पोस्ट, शाळा-महाविद्यालय, शेती, बागा, मुलांसाठी 'गोकुळ', वृद्धांसाठी 'स्नेहालय', औषधालय असे परिपूर्ण नंदनवन स्वयंमेहनतीने, हातापायांची बोटे झडलेल्या खरोखरच्या 'माणसां'नी उभारलंय. या रोगामुळे चेहरे दडदडीत झाल्याने सिंहमुद्रेसारखे होतात. पण याच माणसांनी आत्मसन्मान, श्रमप्रतिष्ठा यांना भिडून उभे केलेले हे जग पाहिले की ते खरोखरीचे 'नरसिंह' वाटतात. त्यांना ही आत्मप्रतिष्ठा देणाऱ्या बाबा आमट्यांसारख्या नरसिंहाला शतशत सलाम! डॉ. विकास, डॉ. प्रकाश हे तर बाबांचेच बछडे. आता डॉ. कौस्तुभ-डॉ. शीतलसारखी बाबांची तिसरी पिढीही सिंहकुलाला शोभेल असेच कार्य करते आहे. आनंदवनातल्या भेटीत डॉ. विकास

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## To Fresh Beginings

**—Mayura Nayak**

How often do we dread to stride on a path unknown? To uproot ourselves from the routine and risk a new path is a difficult decision - a decision arising sometimes out of choice but very often a result of circumstance. A little change in the routine brings in a breath of fresh air. It could be the arrival of a newborn, reallocating ourselves to a new home, etc. The freshness of the change often alters our life for the better. But sometimes such a change can ditch us! The risk of nudging ourselves out of the comfort zone and exploring another avenue can be rather unpleasant. The fear of facing failure and starting all over again is usually the hindrance for most of us to take risks in life. We underestimate ourselves and thus fear exploring - Be it a new job, a new residence, a new vocational stream, reviving an old passion. The 'ifs' and 'buts' create such a huge mind block that we refuse moving out of our cocoon.

It may sound rather strange to an outsider, but we Indians distinguish this risk taking ability of our people by the community we belong to. Historically it is believed that the 'marwadi' and 'gujarati' community reign in their acumen for business, therefore are known to be risk takers or so called gamblers in the game of business. The 'sindhis' are known for their "kanjoos" calculative minds and do rather well in their small time businesses. These are the people who boast of very glorious "rags to riches" success stories. They have made it big because they had the guts to challenge themselves, they had the perseverance, and the confidence to move out of their routine and explore fresh areas. Unfortunately, even today a 'marathi' is believed to be rather naïve and timid in his approach towards his goals in life. An impression of a typical 'marathi manoos' is that of a middle level manager going for a 9-5 job, having a modest home, very satisfied in his life and very proud to be a 'marathi manoos' too, worrying about his children's education, he thinks he has invested well enough in LIC policies to take care of his family's future.

Well, I beg to differ. In my opinion a 'marathi manoos' has evolved beyond the shackles of mediocrity. As I know many of us who have led rather successful lives, moved out and explored. There are many of us who are willing to tread on an unexplored journey, try unique career options, break the routine of a 9-5 job and embrace other business opportunities. Prabhu Tarun has featured such risk takers of our community who have chosen an off beat career in last year's Yuva Manch Section. It was indeed a pleasure to read success stories and educate ourselves on their road to a different career; these were people who chose to walk on an uncertain but promising path and have been successful in their own journey.

Yet, it would be a pleasure to come across more entrepreneurs in not just our community but other marathi communities too. The more we propagate successful entrepreneurs around us, the more the outside world will start believing that we are as good as them or even better. Of course it is important to break this belief that a community makes entrepreneurs.

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

आमट्यांशी आमच्या दीड तास गप्पा रंगल्या, त्या जी'वन'दायीच! 'आमच्या' म्हणजे फक्त आमच्या चौघींच्या. मी, अनुपमा उजगरे, प्रतिभा सराफ आणि धनश्री धारप अशी चौकडीच 'संमेलनोत्तर संमेलन' भरवत, भोगत नंतर भटकत होती.

(अर्थात् एकनाथ आव्हाड-बरोबरही मी येथे आधी धावती भेट दिली होतीच.)

संमेलन आटोपल्यावर आम्ही नागपूरला गेलो. आमदार निवासात पथाऱ्या टाकल्या. दुसरा दिवस उजाडला तो अलैकिक आनंद घेऊन. नागपूरहून दीड दोन तासांच्या अंतरावर असलेल्या सावनेर गावी. सावनेर? माहित्येय का? नवसारीला जन्म आणि सावनेरला मृत्यू होणाऱ्या राम गणेश गडकऱ्यांचे गाव. नवसारी-सावनेर या दोन्हींमध्ये तीच सारखी अक्षरे आहेत म्हणून त्यावरही कोटी करून अल्प वयातल्या मृत्यूला हसत हसत सामोरे जाणाऱ्या कवी गोविंदाग्रजांचे गाव. त्यांच्यातला विनोदी 'बाळकराम' असा सततच जागा असायचा. या गावी त्यांचे घर आहे. गंमत म्हणजे हे अलक्षित आहे, मोडकळीला आलेले आहे, घरापुढची बाग सुकलेली आहे वगैरे बातम्या त्याआधी नुकत्याच वर्तमानपत्रात आलेल्या होत्या. संमेलनातही याबद्दल चिंता व्यक्त करून ठराव पारित झाला होता. म्हणून मनात अनेक शंका वळवळत ठेवून आम्ही सावनेरला पोहोचलो. कवी गणेश भाकरेंच्या भरवशावर. तर आमचे सरकारी इतमामात स्वागत झाले. राम गणेश गडकरी चौकात त्यांचा अर्धपुतळा आहे. त्या पुतळ्याला माझ्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. 'गणेश सार्वजनिक वाचनालय' आहे. एवढ्याशा गावात असलेल्या या वाचनालयात गडकऱ्यांची पुस्तके, हस्तलिखिते आहेतच; पण पंधरा हजार इतर पुस्तके आहेत. तेथे माझे छोटेखानी भाषण झाले. राम गणेश गडकऱ्यांच्या समाधीस्थळावर जाऊन आम्ही सर्वांनी फुले वाहिली. शेवटी त्यांच्या घरी गेलो. बाग टवटवीत होती आमच्या मनासारखीच. ओसरीवर बोडस, दीनानाथ, बालगंधर्व, प्र. के. अत्रे इत्यादींसमवेत असलेले गडकऱ्यांचे फोटो भिंती सजवत होते. माजघर, गडकऱ्यांनी जेथे अखेरचा श्वास घेतला ती खोली, मागील पडवी, माडी, माडीवरील आणखी एक छोटी माडी (आपल्या भाषेत 'कातेरा'!), परसदारी चांगली बाग, विहीर अगदी स्वच्छ. सगळे नीट जपलेले आढळले. १९८५ मध्ये गडकऱ्यांच्या जन्मशताब्दीवर्षात सरकारने हे घर ताब्यात घेतले. तेव्हापासून ते 'स्मारक' आहे. प्रत्यक्ष आणि ऐकीव बातम्यांमध्ये फरकच फरक आढळला. दिव्य भारलेल्या अशा वातावरणात मग ओसरीवर आमची मांडा ठोकून मैफल जमली. गावातील सहा कवी, सरकारी प्रतिष्ठीत अशी दहा माणसे, आम्ही चौघी एवढ्यांचीच. पण खूप रंगली. राम गणेश गडकरी एक थोर नाटककार, गोविंदाग्रज एक थोर कवी आणि बाळकराम एक थोर विनोदी लेखक. अशा या थोर साहित्यिकावर मी मनापासून बोलले. ते सरकार दप्तरी ध्वनिमुद्रित झाले. 'खूप वर्षांनी असे सुंदर बोलणे ऐकायला मिळाले' अशी हळुहळू जमत गर्दी केलेल्या गावकऱ्यांची प्रतिक्रिया ऐकली तेव्हा वाटले, 'या भाषाप्रभूचीच ही पुण्याई.' मग सहासात कवींनी आपल्या कविता त्या 'घरी' सादर केल्या. 'कवींचा कारखाना' या बाळकरामांच्या लेखाची आठवण आलीच! पण त्या मातीचा परीसस्पर्श आम्हा सर्वांच्याच मनाला झाला होता.

हा परीसस्पर्श गोंजारत नंतर आम्ही रामटेकलाही गेलो. कृष्णधाम, रामटेक याबरोबरीने कालिदासाने जेथे मेघदूत लिहिले ती मेघडंबरी पाहिली. परीसस्पर्श ताजा असल्याने या डंबरीत बसून आम्ही कालिदासाचे 'कश्चित्कांता...' असे मेघदूतातील काही मूळ संस्कृत श्लोक आणि कुसुमाग्रजांनी त्याचा केलेल्या समश्लोकी सुंदर अनुवाद यांचे वाचन केले. मोबाईलच्या आजच्या जगात 'मेघदूत' कुठून अवतरणार? पण त्या डंबरीत तो पुन्हा असा अवतरला. छोटेखानी संमेलनच की ते!

असो. मोबाईलच्या उल्लेखाने इथे पुन्हा आजच्या जगात आले मी. अरे हो की! या जगात सध्या परीक्षा चालू आहेत; नाही का? सर्व परीक्षार्थींना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा! विद्यार्थ्यांनो, तुमच्या यशाने घरोघरी आनंदाचे संमेलन भरू द्या!

✶

## प्रगतीची आस

आला, आला पहाटेचा गार गार वारा
जाग आणवी निद्रिस्त मनाला
अंगावर येई गोड शिरशिरी
लागली चाहूल शिशिर हा आला ।।
शिशिरामध्ये सारी विखुरली पानें
वाळल्या काटक्या जणू वार्धक्याचे
जिणें
असल्या काटक्या जरी वाळलेल्या
खोडांत परि असे ही जिद्द
जसे वठल्या पानी हिरवटपण ।।
शिशिरानंतर कोकिळ, हळूच घालतो
साद
म्हणे, 'आला वसंत'
सारी सृष्टी आनंदली
लतावेली पालवली ।।
दु:खामागुनी सुख, अंधारामागुनी
प्रकाश
रात्री नंतर उगवे दिवस
ऊठ मानवा चाल पुढे
मनी धरूनि प्रगतीची आस ।।

**– यशोदिनी यदुवीर राणे**

(पान १ कॉलम ४ वरून)

It takes the perseverance of an individual and the back up of his family and social circle to walk a different path. It is true that many other communities stand united to help their fellow members in any small and big challenges. Help may not necessarily be monitory, but it could be help in networking, help in tutoring, offering a business advice, or even offering an internship to gain some experience in the specialization that a youngster wants to explore! If nothing else, then simple good wishes and encouraging words also work wonders! Nevertheless, seeking help through the right people for breakthroughs is as important as offering help! We have many of our community members who hold high positions in various fields and can offer such help to youngsters in our community. But our youngsters may not even be aware of them. The younger generations have got attuned to a misconception that the community is only for their grandparents and parents to mingle. They yet have to find out such advantages which they can seek by merely interacting or actively involving themselves. They continue to fear and dread to walk on an unknown path, least realizing that the community they belong to could have someone like them, who thought similarly some years ago and managed to make a great career and a successful life with the same unique off beat profession that they today fear. This can happen only if the community as a whole upgrades its array of involvement amongst its people to other aspects of life!

It is time that we rise above the usual and sometimes regressive areas of discussion to more progressive subjects. Yes we all know that usage of the "English" language is extremely high in our newsletter, which is often criticized by many of our fellow PP members. With due respect to all these members, I would like to reiterate that if another language connects better with the future of the pp community, then it is time you all bypass this bit and embrace the new youth who is coming forward to participate actively by contributing to the content of this newsletter. Where else would you be able to read the journey of a highly designated market researcher, a talented event manager, a photographer, a grooming specialist, if it was not for the flexibility of our newsletter to allow these talented people to express their views in our 'Yuva Manch' section throughout the last year? The point is not "WHICH" language they are writing in, but "WHO" is writing! Please notice the variety and usefulness of the content available today in a community magazine which can help career decisions for our own people. These people would continue shying away from the community had we not allowed them the flexibility of language. If these articles have encouraged even one youngster to defy traditional career streams and explore something new, then I believe that the community newsletter is doing its job and catering to its rightful audience, which is the future of the community.

Performing Arts has been a critical binding force in our community. We took a risk by setting a large stage to showcase this art and it paid off! It all began with 'Pratyush', which brought together tons of youngsters who got a platform to showcase their talent. Today 'Pratyush' has become a benchmark in bringing the community closer. Programs like Pratyush further instil our faith and confirm that we are in the right direction. We now want to look forward and set another trend with a new showcase of our own community. It may be a risk, but we will walk the unknown path to explore and test our capacity. This time we will bring forward a totally different facet of the people of our community. We hope that this fresh beginning will also mark a new trend and encourage a new set of talented people giving them their due recognition. Well, right now it all seems to be a jigsaw puzzle that we all are trying to solve, but sooner and surely we will spill the beans of our next project – 'Pratyush' will don a new look and enthral the art lovers with masterpieces awaiting everyone's appreciation! I may sound ambiguous to you all, but spare me, as that's exactly what I am. It may be early to talk more on this, we have our set of challenges and sooner we resolve them, we shall announce our next project!

Higher the risk, greater is our determination to make it work, greater the determination, higher the efforts and thus higher the chances of success. Sometimes we only realize during such times what we are capable of as these times test our abilities. The will to fulfil against all odds is at its peak when we have lots at stake. To emerge as a winner in all we do, breaking the shackles of mediocrity is extremely important. A calculated risk will always allow us to explore the unknown and sometimes even explore our own worthiness! If we don't allow ourselves that chance we may lose the opportunity to know more about our own self. In our careers as well as our personal lives, we owe ourselves that chance, that risk to keep bringing out the best in us. Today I am at that time of my life, where I think I am starting all over again! While I explore the unknown, and test a new direction in life, I hope I emerge as a winner at the end of the journey. Till then, here I raise a toast to A FRESH BEGINNING!

लेखांक-३

# कालची मुंबई-आजची मुंबई

— विश्वास नारायण अजिंक्य

स्वत:च्या बळावर शत्रूशी लढण्याची ताकद येईपर्यंत पडते घेऊन वागायचे धोरण इ.स.१७४० पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीने अवलंबले होते. कंपनीचे स्वत:चे नाणे असावे यासाठी लंडनमधील कंपनीच्या संचालकांकडे स्वतंत्र टांकसाळ काढण्याची परवानगी मागितली गेली. ती मिळाल्यावर १६७२ साली टांकसाळ निघाली. मुंबईतील टांकसाळीला मदत म्हणून सुरतेसही नाणी पाडीत असत. या नाण्यांची देवघेव मुंबई व आसपासच्या मुलखातच होत असे. तिच्यातून बाहेर पडणाऱ्या नाण्यांना मोगल, मराठे यांच्या राज्यात मनाई होती. वजन, आकार व धातुची शुद्धता या तिच्या गुणांमुळे त्या नाण्यांचा प्रसार वाढतच गेला.

व्यापारी मानसिकतेमुळे कायद्याचे राज्य ही इंग्रजी अमदानीची देणगी मुंबईने चटकन उचलली व अंगी बाणवली. पोलीसखाते, न्यायालय, नगरपालिका, विद्यापीठ यांनीसुद्धा स्वच्छ कारभाराच्या परंपरा निर्माण केल्या व तडफदार प्रशासक दिले.

आपण यापुढे स्वतंत्र राज्यकर्ते आहोत याच्या तीव्र जाणीवेमुळे कंपनी प्रजेच्या न्यायनिवाड्याच्या कर्तव्यामागे लागली. मुंबईतील पोर्तुगिज कायदे, भाषा वगैरे गोष्टींना सक्त मनाई करण्यात आली. इ.स.१६७२ मध्ये न्यायदानासाठी 'कोर्ट' चालू केले. इ.स.१७२८ साली पहिले कोर्ट बंद करून इंग्लंडच्या राजाच्या सनदेने 'मेयर्स कोर्ट' ही संस्था स्थापन केली गेली. वास्तविक न्यायदानाची व्यवस्था लोकांच्या कल्याणासाठी असूनसुद्धा सामान्य जनतेत ती सुरवातीच्या काळात कुचेष्टेचा विषय झाली होती. टिंगल करणाऱ्यात कंपनीची गोरी माणसेही सामील असत. हा प्रकार रस्त्याने जाता-येता माणसे काय बोलतात यावर नजर ठेवून टिंगल करणाऱ्यांना शिक्षा देऊन बंद करावा लागला. त्यामुळे न्यायदानाबद्दल लोकांत वचक व आदर उत्पन्न झाला. न्यायाच्या कारभारात भाग घेणाऱ्या हिंदू साक्षीदारांना आपल्या जबानीस प्रारंभ करण्यापूर्वी खरे बोलण्याविषयी शपथ घेण्यासाठी न्यायदानाच्या जागी गाय आणून ठेवीत. तिची शेपटी हातात धरून शपथ घ्यावी लागे. जनतेच्या नाराजीमुळे गाईचे शेपूट हाती घेण्याची अट नंतर रद्द केली गेली.

'मेयर्स कोर्टात' ज्युरी फक्त ख्रिश्चन असावेत या नियमामुळे हिंदी लोकांना ज्युरी म्हणून सामील करण्यासाठी १७९८ साली 'मेयर्स कोर्ट' मोडून 'रेकॉर्डर्स कोर्ट' अस्तित्वात आले. १८२४ मध्ये ते जाऊन त्याजागी 'सुप्रिम कोर्ट' आले. 'सुप्रिम कोर्ट' १८६२ साली हायकोर्टाच्या स्थापनेनंतर लयाला गेले. हायकोर्ट अस्तित्वात आल्यानंतर न्यायदानाच्या कामाला बरीच शिस्त लागली.

मुंबईत सुरवातीला भरपूर कोरड्या जागेच्या अभावामुळे चाकांच्या गाडीचा वापर अशक्यच होता. त्यामुळे पालखी या वाहनाचा सर्रास उपयोग होत होता. वाटेत चिखल असो अथवा पाणी, खाच-खळगे असोत अथवा चढ-उतार; पालखीवाहक पालखी-तल्या माणसांना आरामात नेत असत. मुंबईत १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत पालखीचा वापर केला जात होता. जे भाग पाण्यात होते तेथे अर्थातच होड्या व नावा वापरल्या जात. नंतर बैलगाडी आली. तर १९व्या शतकाच्या सुरवातीस घोडागाडी आली. इंग्लंडमध्ये इ. स. १८२० मध्ये आगगाड्या आल्या. त्यानंतर काही वर्षातच त्यांनी आपल्या देशात प्रवेश केला. इ. स. १८४३ पासून आगगाडीसाठी लोखंडी सडका टाकायचे काम सुरू झाले. १६ एप्रिल, १८५३ ला भायखळा स्टेशनवरून पहिली गाडी मोठ्या समारंभाने संध्याकाळी ५ वाजता ठाण्याला जायला निघाली व रात्री ८ च्या सुमारास परत आली. आगगाडीने प्रवासाचे नवे युग सुरू झाले. मुंबईचा देशातल्या दूर दूरच्या शहरांशी संबंध जोडला गेला. लोकल गाड्यांनी उपनगराची रहदारी सुखाची केली.

१८७४ मध्ये आधी एक घोड्याच्या मग दोन घोड्यांच्या ट्रॅम्स् अस्तित्वात आल्या. त्या १९०७ पर्यंत होत्या. त्यासाठी जवळपास ९०० घोडे दोन तबेल्यांत विभागून ठेवले होते. एक तबेला राणीच्या बागेच्या समोर तर दुसरा कुलाब्यास होता. १९०७ साली विजेच्या ट्रॅम्स् सुरू झाल्या. विजेच्या ट्रॅम्स् थांबवण्यासाठी निश्चित जागा होत्या; पण घोड्यांच्या ट्रॅम्स् उतारू आपल्या मर्जीस येईल तेथे थांबवीत. ट्रॅम्समुळे वाहतूक मोठ्या रस्त्यांवरच नव्हे तर गल्ली बोळातसुद्धा सुरू झाली. १९०१ साली मोटार आली. तर १९१९ साली मुंबईत पहिले विमान होते. त्याचा मुक्काम जुहू-विलेपार्ले दरम्यानच्या मोकळ्या जागेत होता. ते पाहण्यासाठी व त्यात बसण्यासाठी दुपारच्या वेळी शेकडो लोक तेथे जात. प्रत्येकाकडून तीन रुपये भाड्यादाखल घेऊन अर्धा तास विमानातून फिरवून आणीत.

इ.स.१८५४ मध्ये तिकीटाचा वापर करून पद्धतशीर टपालसेवा सुरू झाली. आगगाडीमुळे टपालाची ने-आण सुरक्षित व जलद होऊ लागली. डाकेची जबाबदारी सरकारने स्वीकारल्यावर पत्रांची लांबी-रुंदी व वजन यांचे नियम तसेच डाक जेथे जावयाची तेथील अंतराप्रमाणे खर्चाचे कोष्टक बनविले. आगगाडीच्या बरोबरच तारायंत्रही सुरू झाले. तर १८८० मध्ये टेलिफोन आला.

इंग्रजांनी व काहीसे त्यापूर्वी परदेशी मिशनऱ्यांनी हिंदी मुला-मुलींच्या शाळा भराभरा अस्तित्वात आणून महत्त्वाचे काम उत्साहाने व चिकाटीने सुरू केले. इंग्रजांच्या शाळा सर्वप्रकारच्या व्यवहारोपयोगी विषयांचे ज्ञान नव्या पिढीला देण्यासाठी होत्या. इंग्रजांचे शैक्षणिक धोरण निरपेक्ष होते. एकीकडे शाळा एकामागून उदयास येत असताना इंग्रजांनी दूरदृष्टी दाखवून उच्च शिक्षणासाठी तीन विद्यापीठांची स्थापना केली. जानेवारी १८५७ मध्ये प्रथम कलकत्ता येथे, नंतर जुलै १८५७ मध्ये मुंबई येथे, तर सप्टेंबर, १८५७ ला मद्रास येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. हे इंग्रजांचे भारतीयांसाठीचे फार मोठे योगदान आहे. विद्यापीठाने आपल्या परीक्षांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्या देण्याचा प्रघात पाडला. त्या पदव्यांचा लोकांत व सरकारात आदर बाळगला जात असे. विद्यापीठातून शिकणाऱ्यांना उत्तेजन म्हणून उदार धनिकांनी विद्यापीठात पैसे भरून तसेच देणग्या देऊन, छात्रवृत्ती, पदके, रोख बक्षिसे ठेवली. विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी शालेय शिक्षणाची मॅट्रिक्युलेशन ही अंतिम परीक्षा ठेवली होती. शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपेक्षा विद्यापीठाचा पदवीधर ज्ञानाने श्रेष्ठ असा समज लोकांचा झाला. प्रेमचंद रायचंद या शेअर दलालाने दिलेल्या ४।। लाख रुपयांच्या देणगीतून मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथसंग्रहालयाची इमारत व त्यालगतचा शिखरावर घड्याळ असलेला राजाबाई टॉवर बांधण्यात आला. राजाबाई हे त्यांच्या आईचे नाव.

१८६५ साली मुंबई नगरपालिका कायदा प्रथम अंमलात आला. त्यानंतर १८७२ साली अंमलात आलेल्या नव्या कायद्यातील तरतुदींनुसार ६४ प्रतिनिधींची मुंबई महापालिका अस्तित्वात आली. मुंबई महापालिकेला रस्ते बांधणी, रस्ते दुरुस्ती, घर बांधणी इत्यादी कामे तिची अन्य कामे सांभाळून करणे कठीण जात होते. ही कामे करण्यासाठी एखादी स्वतंत्र विश्वस्त संस्था असावी या हेतूने बॉम्बे इंप्रुव्हमेंट ट्रस्टची (बी.आय.टी.)ची स्थापना करण्यात आली. या ट्रस्टने रस्ते बांधणी, भराव घालणे, लोकांसाठी निवासाची सोय करणे इत्यादी कामे केली. तर १९२० साली बॉम्बे डेव्हलपमेंट डायरेक्टोरेट या अभिकरणाची स्थापना केली. बॉम्बे डेव्हलपमेंट डायरेक्टोरेटने (बी.डी.डी.) कारखान्यातील लोकांच्या ५०,००० कुटुंबांसाठी घरे बांधण्यासाठी योजना हाती घेतली. या योजनेत २०७ चाळी बांधण्यात आल्या. प्रत्येक चाळीत ८० खोल्या होत्या. डिलाईल रोडवरती ३२, नायगांवला ४२, वरळीला १२१ आणि शिवडीला १२ चाळी बांधल्या. या चाळी १९२९ मध्ये कलेक्टरच्या हवाली करण्यात आल्या. परंतु या चाळीचे बांधकाम व त्यांची रचना इतकी वाईट होती वी ज्यांच्यासाठी त्या बांधल्या त्यांना जागेची अत्यंत गरज असूनसुद्धा त्या जागेत रहायला त्यांनी नकार दिला. १९३०च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सत्याग्रहींना डांबण्यासाठी या चाळींचा तुरुंगासारखा उपयोग केला गेला. नंतर हजारो रुपये खर्च करून थोड्याफार रहाण्याजोग्या बनवल्या गेल्यावर लोक तेथे राहू लागले.

✶

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

## Desai'cively yours

**- Anuradha Desai**

And two months have flown by in a blur since we last met! Did u notice them? We are now towards the end of the first quarter of the year!!! Alarm bells are ringing in my head at the thought of all the plans I had laid for the year, and which are still gathering dust. It seems I'm running so fast, but may be on a treadmill, because I find myself in the same place!

I think am playing the role of a double agent. When I'm at home cooking, cleaning, feeding, bathing, bringing up the kids, I'm constantly thinking of catching up on my mail, returning that phone call when the cacophony dies down, skipping pages in the bed time story so that I can start working on that presentation, until Ads notices, and makes me start all over again. And at work and when I'm travelling, I'm constantly calling home to check whether Ads got to school in time, Abs' fever has subsided, planning the school science project which had to be submitted yesterday, arranging for the fancy dress costume, co-ordinating with the house help so that at least tomorrow she makes it before I leave...well, you get the picture. And let's not even talk of the third party, my husband. When I do happen to look at him sometimes, he seems to be caught in the cross fire, and has a sort of curious expression kind of wondering what he is doing there, or what he is supposed to do there.

Trying to be good parents, we try and expose our kids to as many experiences as possible, meet friends, family, do picnics and parties, but the one thing we haven't done is putting them in any kind of extracurricular classes, I haven't even enrolled Abs in a playschool, and she's past two. While their peers attend assorted Abacus, Vedic Maths, Taekwondo, gymnastics, skating, tennis, guitar, and what have you classes, my kids help me bake cup cakes, decorate greeting cards, make fairy moulds, pull each other's hair and make me want to pull out mine. They are just growing like weeds. Tall, strong and unaccomplished!

While I grapple with guilt about all my inadequacies as a mother, my husband is very pleased with himself at the job he is doing as a father. May be because men today can only be better fathers than their fathers. Simply by knowing how to change a nappy or figuring which hole to stick the bottle in: these things mark them out as more capable parents than any previous generation. But women can only be worse mothers than our mothers and this rankles because we are working so very very hard and we are doomed to fail.

An ending is out of the question. What would I change if I could? Nothing about my kids with their innocence and sweetness, and their need of me, not the relative sanity of my job and the accomplishments, not the husband I am legally bound to love not the family and friends for whom schedules can always be pushed about, and suddenly it seems all worth it to make the effort and stretch and then stretch some more.

As in the nursery rhyme, the wheels on the bus go round and round, all day long.

**Bol Baby Bol:**

Ads (my six year old daughter) and I were driving past a construction site where a giant excavation was being done probably accommodating a couple of basements. We paused and got out to look and I was pretty impressed with all the activity, the giant machinery at work, huge pit in front of us, mountains of dug up mud and thought that Ads would've found it interesting too. But she looked worried...she said "Aai, Mother Earth la kiti traas zaala asel na?"

Now did u even think??

✶

## सावर्डे पूल

**— नितीन नवलकर**

माझ्या डाव्या बाजूला अथांग समुद्र होता, आणि उजव्या बाजूला एक छोटीशी टेकडी.

सूर्यास्त व्हायला आला होता. मी सायकलवरून जवळ-जवळ ५ किलोमीटर पुढे आलो होतो आणि मागे वळून बघितले तर माझे मित्र कुठे तरी खूप मागे राहिले होते. त्यांच्यासाठी थांबूया असा विचार केला आणि सायकल कडेला लावून मी तिथल्या रस्त्याच्या बाजूला जो कठडा होता तिथे उभा राहून सूर्यास्ताची मजा बघायला लागलो. समुद्राचा थंड वारा माझ्या अंगाला स्पर्श करताच माझ्या अंगावर सुखद काटा आला. लालभडक तो: सूर्याचा गोळा हळूहळू समुद्राच्या पलीकडे क्षितिजाला टेकला आणि हळू-हळू पाण्याखाली लुप्त झाला. तो देखावा मी अजूनही विसरू शकलो नाही. बाजूने एक ट्रक वेगाने हॉर्न वाजवत गेला. ट्रकचा हॉर्न कानात पडताच मी भानावर आलो. बघितलं तर १० मिनिटे होऊन गेली होती व सूर्यास्त होताच झपाट्याने काळोख पडू लागला होता.

मला गावाचा रस्ता नीट माहीत नव्हता. आम्ही सगळे कॉलेजचे मित्र हर्णेला आमच्या मित्राच्या गावाला कोकणात गेलो होतो. हर्णेवरून २०-२५ किलोमीटर वर आणखी एका मित्राच्या गावाला सायकलवरून गेलो होतो. परत हर्णेला येताना माझे सगळे मित्र कोठेतरी मागे राहिले होते. १९८८चे दिवस होते, जेव्हा मोबाईल वगैरे नव्हते की एक फोन केला आणि विचारलं, ''कुठे आहात रे?'' रस्ता माहीत नसल्याने जास्त काळोख होण्याआधी हर्णेला पोहोचूया असा विचार करून मी तिथून सायकल काढली.

थोडा पुढे जाताच नागमोडी रस्ता सुरू झाला. रस्ता समुद्रापासून दूर जाऊन टेकडीजवळ वळत होता. सायकलवरून जाताना अंगाला गार वारा लागत असल्याकारणाने मस्त वाटत होते. सायकल चालवताना मला जाणवले की १०० मीटरवर एक छोटा पूल होता. जो त्या टेकडीच्या पायथ्याजवळ होता. त्या पुलाच्या एका बाजूला टेकडी तर एका बाजूला नाला होता. पूल जिथे सुरू होता तिथे एक पिंपळाचे झाड होते. टेकडीच्या पायथ्याशी त्या पुलावर पोहोचताच मला कोणी तरी हाक मारली-शूत-शूत...

मी मागे वळून पाहिले, तर कुणीच नाही. मी सायकल थोडी हळू केली आणि कानोसा घेतला. मला परत हाक आली...शूत-शूत. हाक नक्की आली होती, म्हणून मी सायकल थांबवली. आवाज कुठून येतो आहे ह्याचा अंदाज घेत होतो इतक्यात एक आकाशवाणी झाल्यासारखा आवाज आला- ''कुठे चाललास रे?'' तो: आवाज इतका मोठा होता की माझ्या अंगावर शहारे आले. पण त्याच वेळी माझी नजर त्या पिंपळाच्या झाडावर गेली आणि मला तिथे काहीतरी हलल्यासारखे दिसले. काय करावे आणि काय नाही हे कळण्याच्या आत मला जाणवले की मला कुणी तरी पाठून धक्का दिला. त्यानंतर मला हेच आठवते आहे की मी तिथून जी सायकल पळवली; माझा अंदाज आहे की मी ५०-६० कि.मी. ताशी ह्या वेगाने सायकल चालवली असेल. जवळ जवळ १०-१५ मिनिटे मागे वळून बघितले नाही. संपूर्ण रस्त्यात काळोख किट्ट होता. मी किती वेळ सायकल चालवली ह्याचा मला अंदाज नाही. बजरंगबलीचा जप सुरू करताच मला थोड्या दूरवर दिवे दिसायला लागले. माझा सायकलचा वेग आणखी वाढला. ते दिवे म्हणजे हर्णे गावाची हद्द होती. तिथे काही मुलं खेळत होती. त्यांना बघून माझ्या जीवात जीव आला. तिथे थांबताच मी त्या मुलांना घरचा रस्ता विचारला. पण घरी जाऊन तरी काय उपयोग? घराची चावी तर मित्राकडे होती. म्हणून तिथेच त्या मुलांच्या संगतीत थांबलो. त्यावेळी मला जाणवले

(पान ६ कॉलम २ वर)

लेखांक ३

# चिमणीच्या दातांनी पाकळीफुलाची

-कल्पना सुभाष कोठारे

'धन्यवाद देवा!' टाकते म्हणून
सालाबादप्रमाणे यंदाही-
तो आला होता म्हणून
अपेक्षांचे गाठोडे घेऊन,
उपेक्षांचे सल विसरून,
मिष्टान्नाचे घास घेऊन,
सुहृदांचे फोन्स घेऊन,
सालाबादप्रमाणे यंदाही-
तो आला होता म्हणून
बघता, बघता, गेला संपून
ठरवलेले करायचे, गेलेच राहून
'मिळाले तेवढेच पुरे' म्हणून
सालाबादप्रमाणे यंदाही-
गेला नं तो पटकन् निघून!
तसे सारेच गेलेत सांगून
परत तो येणाराय म्हणून,
त्याला लक्षात ठेवणारे दिलेस
म्हणून, 'थँक यू गॉड' टाकते म्हणून
'हॅपी बर्थडे, हॅपी बर्थडे!'
घुमतेय कानात अजून धून!

तर असा 'तो'–माझा वाढदिवस येऊन गेला. मित्रमैत्रिणी, आणि नातेवाईक मिळून, मला फक्त सत्तावीस फोन्स आले. सकाळी आठ ते बारापर्यंत कॉर्डलेस फोन आणि स्वयंपाकघरातील आयुधे यांचा, खोखोचा सामनाच चालू होता. नोकरीवरून परतल्यानंतर केलेल्या फोनकॉल्सची संध्याकाळच्या स्वयंपाकाबरोबरची मॅचही मस्त रंगली. (फक्त एकाच फोनने माझे वय विचारण्याचे धाडस केले.) शुभेच्छा दिल्यानंतर प्रत्येकजण विचारत होता /ती- 'मग काय खास बेत आज? पिक्चर कुठलं? डिनरला कुठे?'– स्वत:च्या आनंदाच्या कल्पना, प्रत्येकजण माझ्यावर लादू पाहत होता/होती. काहीजणांसमवेत मी माझी आनंदाची कल्पना 'शेअर' केली. 'वा! वा! छान कल्पना!' 'हाऊ रोमँटिक!'-वगैरे प्रतिक्रिया आल्या. 'दे वेअर ग्लॅड फॉर मी!' हे महत्त्वाचे! माझ्या खुषीत सर्वच फोनवर सामील झाले. एक भाचा फोनवरच 'खो!खो!' हसू लागला. अन् मीही (वय विसरून) त्याच्यासोबत मनसोक्त 'खि!खि!' करून घेतले. माझी ऐसपैस आकृती डोळ्यासमोर येऊन तो हसला असावा, मी सकाळीच वाढदिवसानिमित्त मिळविलेल्या आनंदाने हसत होते. तो पोरकट, विनोदी वाटणारा बालआनंद मी मागून, मागून घेतला होता. सँटाक्लॉसला गिफ्ट मागावी नां? तसाच!

भल्या सकाळी चालायला, पळायला, हसायला, अनेकजण जातात. (त्यात काय मोठंसं?) आम्हीही चक्क ऑटोरिक्षाने एक जॉगिंग पार्क गाठला होता. तिथे मोठ्यासाठीही झोपाळे आहेत. त्यापैकी एक रिकामा होताच, त्यावर बसून मी उंच, उंच झोके घेतले. उंचावरून चालणारे, पळणारे, मजेशीर दिसत होते. त्यातील माझा सहचर हुडकण्यात आगळीच मजा येत होती. जवळच्या ताटव्यातील फ्लॉक्स- सदाफुलीची इंग्रजी भावंडे-बहुधा आम्हा 'दोघांना' पाहूनच हसत असावी. ओठावर गाणी येत होती. कानाशी वाऱ्याची झुळुक मैत्रिणीसारखी कुजबुजत होती. सूर्याची कोवळी किरणे मधेच 'भोज्या' म्हणून शिवत होती. वाढदिवसाचा सोहळा साजरा होत होता. मनसोक्त झोके घेऊन, तृप्त, तृप्त होऊन मी घरी परतले.

नंतर मघाशी सांगितलेला कामाचा आणि कॉर्डलेस् फोनचा सामना सुरू झाला. अंपायरने मधेच शिटी वाजवावी तशी दारावरची घंटी वाजे आणि पुष्पगुच्छ येत. लिली, ऑर्किड्स, जरबेरा, ॲस्टर्स, शेवंती, गुलाब यांचा खजिनाच ओतल्या गेला. फ्लॉक्सचे रंग मनात टवटवीत असतांनाच विविध पुष्परचना सुखवीत होत्या. एक रचना तर दोन फूट रुंद (उंच न्हवे) होती. कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेता, दूरून बांगलादेशहून महाराष्ट्रात येऊन पुष्परचना करून पोट भरणाऱ्या या कलावंतांचे खूप कौतुक वाटते.

'केवढ्या महाग असतात नं या पुष्परचना! शिवाय सुकायला लागल्या की दुर्गंध येतो!' कोणी एक अरसिक म्हणाल्याचे आठवले. कागद, पेन, पोस्टेज, कुरिअर वगैरे खर्चाचा विचार करीत, एखाद्याने लेखनच सोडले, तर वाचकांना व त्याला स्वत:लाही मिळणारा आनंद, गमवावा लागेल. सतत खर्चाचा विचार केला, तर जीवनातील सौंदर्यच हरवेल नं?

फुलांसारखीच मनाला आनंद देणारी आणखी एक गोष्ट म्हणजे 'अल्प मोबदला' होय. पहिली वहिली कविता छापून आल्यानंतर मिळालेले छोटे मानधन अजूनही लक्षात आहे. गिरिजा कीर या त्या मासिकाच्या सहसंपादिका होत्या. लेखक, लेखिका, कवी, कवयित्री यांना मानधन मिळालेच पाहिजे-अशी भूमिका घेऊन त्यांनी त्या मासिकापुरता चांगला पायंडा पाडला होता. प्रमुख संपादक-मालकांचे त्यांनी मतपरिवर्तन केले होते.

असाच बालआनंद मागून घ्यावासा वाटतोय. सर्व लेखक, कवी, लेखिका, कवयित्री, संपादक, संपादिका यांना फूल ना फुलाची पाकळी म्हणून मानधन देण्याची प्रथा, प्रभुतरुणाची कार्यकारिणी लवकर सुरू करो-अशी आशा व्यक्त करून थांबते. अच्छा!

फोन नं:- २६१०४५५२

(बाळ आनंद खूपच छान! प्रभुतरुणाच्या वाढदिवशी पाकळीच कशाला?; अख्खे फूलच देऊ की! पण फक्त 'मान' या स्वरूपात.

-संपादक

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा ९७वा वार्षिक बक्षिस समारंभ रविवार दिनांक २६ फेब्रुवारी २०१२ रोजी सायंकाळी ४ वाजता पाठारे प्रभु को ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२वा रस्ता खार येथे श्री. दिपक देऊळकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

समाजाध्यक्षा सौ. वृंदा जयकरांनी उपस्थितांचे स्वागत केले व पाहुण्यांचा परिचय करून त्यांना भेटवस्तू देवून सन्मानित केले. उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकर यांनी रौप्यपदक मानकऱ्यांचा परिचय करून दिला. मानकरी होते-

सौ.इना भोलानाथ तळपदे (समाजसेवा रौप्य पदक)

ॲड.सौ.नेत्रा अजित विजयकर (विविधांगी नैपुण्य रौप्य पदक)

श्रीमती शीला भोलानाथ कोठारे (गृहकृत्यदक्ष व समाजसेवा पदक) त्याचबरोबर समाजाच्या विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर ह्यांनी शीलाताईंच्या वयाच्या नव्वदीप्रीत्यर्थ व समाजसेवेच्या योगदानाबद्दल महिला समाजतर्फे शाल व श्रीफल देवून सत्कार केला.

डॉ.सौ.मेघा संजीव धुरंधर, श्रीमती सरोज नवलकर शारंगपाणी, कु.जुई हिमांशु आगासकर व श्रीमती सुशीला पांडुरंग कोठारे ह्या भगिनींचा विशेष कार्य केल्याबद्दल गौरव करण्यात आला. त्यांचा परिचय चिटणीस सौ. अक्षदा तळपदे यांनी करून दिला.

समाजाध्यक्षा सौ. वृंदा जयकर ५० वर्षे महिला समाजात कार्यरत असल्याबद्दल श्रीमती वंदना नवलकर ह्यांनी त्यांचा शाल व मिठाई देवून सत्कार केला.

अध्यक्ष श्री. दिपक देऊळकर ह्यांनी आपल्या भाषणात गमतीशीर किस्से सांगून त्यांची मने जिंकली.

विद्यार्थीनीना व भगिनीना शैक्षणिक व स्पर्धांची बक्षिसे देण्यात आली.

श्रीमती नलिनी तळपदे व श्रीमती स्वाती प्रविण राणे रचीत समारंभाच्या गीतांना श्री. शेषनाथ पावसकरांनी संवादिनीवर स्वरबद्ध केले होते. चिटणीस सौ. अक्षदा तळपदे यांनी आपल्या सुमधुर आवाजात गाणी गायिली. त्यांना तबल्यावर श्री. प्रदिप राणे यांनी साथ दिली.

समारंभाचे सूत्रसंचालन चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी केले, व देणग्या आणि आभार प्रदर्शन चिटणीस सौ. नूतन कीर्तिकर यांनी केले. राष्ट्रगीत झाल्यानंतर थंडगार कुल्फीचा उपस्थितांनी आस्वाद घेतला.

❁ शनिवार दिनांक ११ फेब्रुवारी २०१२ रोजी दुपारी ४ वाजता प्रभु सेमिनरी शाळेचे सभागृह, भाई जीवनजी लेन ठाकूरद्वार येथे पाठारे प्रभु महिला समाजाने आयोजित केलेली 'घडा पार्टी' साजरी करण्यात आली. सभासद भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

त्यावेळी विविध खेळ घेण्यात आले. विजेत्या भगिनींना बक्षिसे देण्यात आली. उपाध्यक्ष सौ.स्वाती जयकर ह्यांच्या तर्फे लकी नंबरची बक्षिसे देण्यात आली.

व्हेज व नॉनव्हेज घडा ठेवण्यात आला होता. त्याबरोबर गोड पदार्थ सांजिवरी विश्वस्त सौ. उषा जयकरांतर्फे सर्व भगिनींना देण्यात आली.

❁ १६ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता खार येथील ज्ञाती संकुल सभागृहात वासंतिक हळदीकुंकू समारंभ होईल. भगिनींनी अगत्याने यावे.

❁ दिनांक १७ जानेवारी २०१२ ते दिनांक २३ जानेवारी २०१२ या कालावधीत महिला समाजाची राहण्याची सहल सौराष्ट्रमध्ये गेली होती. सहलीत सहभागी झालेल्या महिलांची संख्या मागील सहलीच्या दुप्पट म्हणजे ३४ अशी होती. ती सुद्धा २८ पासून ७९ पर्यंतच्या वयोगटातील!

वेरावळमधील वास्तव्यात 'सोमनाथ दर्शन' घेऊन रात्री ताज्या माशांचा आस्वाद महिलांनी घेतला. दुसऱ्या दिवशी 'गीर' अरण्यातून मार्गक्रमण करून कनकाई देवीच्या दर्शनाने प्रवासाचा शीण गेला. सर्वांनी मिळून देवीची आरती केली व त्यानंतर देवीच्या प्रसादभोजनाचाही लाभ घेतला. तेथून जुनागढच्या हॉटेलात रात्रीचे वास्तव्य करून दिनांक २० ला द्वारकेला प्रयाण केले. द्वारकाधिशाचे वैभवसंपन्न दर्शन, रुक्मीणी मंदिर, गायत्री मंदिर, पंचमुखी हनुमान, विस्तीर्ण पसरलेल्या सागर किनाऱ्यावरील जयभड-केश्वराचे मंदिर व सूर्यास्ताचा देखावा, तसेच पोरबंदर येथील सुदामा मंदिर व महात्मा गांधीचे जन्मस्थान असलेले त्यांचे घर पाहून भगिनी हॉटेलवर परतल्या. भगिनींचा आवडता विषय म्हणजे खरेदी! ती देखील मनसोक्त झाली.

आलू पराठा-दही, गव्हाचा शिरा-बटाटावडा, इडली सांभार यासारखा विविध प्रकारचा नाश्ता होता. गुजराथी-मारवाडी भोजनावर तर सर्वजणी खूष होत्या. भोजनात असली तुपाने भरलेली पुरणपोळी, गुजराथी फेमस ढोकळा, मेथी

(पान ६ कॉलम ४ वर)

## प्रभुतरुणास देणगी

❁ श्रीमती कस्तुर रवींद्र तळपदे रु. १००१/-

❁ श्रीमती सुशीला पांडुरंग कोठारेकडून रु. ५००/-

❁ सौ. प्रतिभा आणि श्री. सुभाषचंद्र विश्वासराव किर्तीकर यांजकडून त्यांचे सुपुत्र श्री. स्वप्नील यांच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. २५१/-

❁ श्रीमती सरोजिनी नवलकरकडून रु.१५१/-

## अभिनंदन

❁ महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट नेपथ्याबद्दल श्री. अमर अजिंक्य यांना प्रथम पुरस्कार लाभला. प्रभुतरुणाच्या पहिल्या प्रत्युषचे नेपथ्य श्री. अमर यांचेच होते. अभिनंदन.

❁ श्री. नंदू धुरंधर यांनी २०१२ या वर्षीसाठी 'फोटोग्राफी कन्सेप्ट कॅलेंडर' एनआयआर लंडन ही संकल्पना घेऊन तयार केले आहे. मराठी कलाकारांना घेऊन याआधीही त्यांनी एक कॅलेंडर मोठ्या दिमाखात सादर केले होते. त्यावेळी त्यांच्या लंडनवारीचा मोठ्या कल्पकतेने उपयोग करून लंडनच्या निसर्ग, वास्तू अशा वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वभूमीवर चोवीस कलाकारांना त्यांनी देखण्या पद्धतीने सादर केले. कलाकाराच्या वाढदिवसाचे औचित्य राखून एकेका महिन्यात दोन दोन कलाकारांचे वाढदिवसाचे महिने साकार झाले आहेत. राजाराणी ट्रॅव्हल्सच्या अभिजित पाटील यांचे यावेळीही प्रायोजकत्व आहे. कॅलेंडरच्या 'मिक्स अँड मॅच' आविष्कार अत्यंत देखणा केल्याबद्दल श्री. नंदू यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

❁ आदिनाथ महेश कोठारे यांचा सध्या 'सतरंगी रे' हा चित्रपट रंग भरतो आहे. 'ऑल दि बेस्ट' या नाटकातही त्यांच्या अभिनयाचा कस लागतो आहे. त्यांच्या अभिनयाच्या वाटचालीला ऑल दि बेस्ट!

❁ सौ. उर्मिला आदिनाथ कोठारे (कानेटकर) या लावणीसम्राज्ञी विठाबाई चित्रपटातून साकारणार आहेत. शुभेच्छा.

## रामवाडी मंदिर

दर वर्षीप्रमाणे रामवाडी मंदिरात धूलीवंदनाच्या दिवशी (८-३-१२) गाण्याचा बहारदार कार्यक्रम झाला. मनिषा देसाई आणि त्यांच्या गायकसहकलाकार यांनी निरुपणासह गीते सादर केली. श्री. अरविंद धुरंधर यांचा आयोजनात सुविहीत हात होता. उपस्थितांना कॉफी आणि गुलाबपुष्प देऊन धूलीवंदन साजरे केले गेले.

## पाळणा

नीज माझ्या 'अयांश' बाळा
नीज रे वेल्हाळा।
अंगाई गाऊनी
जोजविते छकुल्याला।।
लोचनांत तुझिया भृंग लपले
प्राजक्ताचे देठ ओठी विराजले
जावळ काळे शोभवीया भाळा
रंग गुलाबी गोबऱ्या गाली आला।।१।।
मिटल्या नयनी बघसी स्वप्न उद्याचे
या इवल्या हाती लपले दिन भाग्याचे
झोपेत हांसुनी पाहसी अर्ध उघडुनी डोळा
छुम छुम वाजे पायी घुंगुरवाळा।।२।।
कीर्तीवंत हो, भाग्यवान हो बाळा
धनवान हो, चिरंजीव होई बाळा
उद्धरी तू दोन्ही कुळां
आशीर्वाद देते, तुज लडिवाळा।।३।।

-कवियत्री **यशोदिनी यदुवीर राणे**

(पान ४ कॉलम ४ वरून)

की घामाने ओलाचिंब झालो होतो. श्वास आता थोडा स्थिरावला होता.

तिथल्या मुलांनी विचारले की मी कुठे गेलो होतो? मी गावाचे नाव सांगताच त्यांनी विचारले, ''मग आता येताना सावर्डे पुलावरून एकटेच आलात?'' त्यांच्या ह्या प्रश्नाने माझ्या डोक्यावर परत घाम फुटला. कसा बसा धीर सावरून मी त्यांना विचारले ''हो पण का?'' तेव्हा त्यांनी मला सांगितले ''अहो ते पिंपळाचे झाड हाय ना तिथये ती बया बसते. रात्री येणाऱ्या जाणाऱ्याना इचारते- कुठे चाललास?'' कोण तिथे थांबला की जाते त्याच्या खांद्यावर बसून त्यांच्या घरी....''

मी सुन्न झालो होतो हे ऐकून. इतक्यात मला सायकलच्या ट्रिंग ट्रिंगचा आवाज ऐकायला आला. माझे सर्व मित्र तिथे आले होते. त्यांना बघून माझ्या जीवात जीव आला. झालेली सर्व हकीकत मी त्यांना सांगितली. ते एकमेकांकडे बघायला लागले... त्यांचे आश्चर्यचकित चेहरे बघून माझ्या मनात थोडी चिंता निर्माण झाली. इतक्यात आमचा मित्र पक्या म्हणाला, ''अरे अतुल तू बीडी पेटवायला माचिस ज्या बाईला दिली ती आपल्याला त्याच पिंपळाच्या झाडाखाली भेटली होती ना रे???''

// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*
*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत.*
*पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*
*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*
*खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

# प्रभुतरुणाची डायरी

## बाळा जोजो रे

| | | | |
|---|---|---|---|
| ०३-०१-१२ | सौ. प्रणाली आणि श्री. अभिजित नवलकर, | पुत्र, | सांताक्रूझ |
| १६-२-१२ | श्री. मंजुष मिलिंद रामकृष्ण कोठारे, | पुत्र, | मेलबोर्न (ऑस्ट्रेलिया) |

## आत्याबाई नाव बोला

| | |
|---|---|
| १९-१-१२ | ओम् अभिजित नवलकर |
| ११-२-१२ | वीर (शान) गुंजारव नायक |
| १६-२-१२ | क्रिश मंजुष मिलिंद कोठारे |

## नारळसाखर दिला

| | | |
|---|---|---|
| १७-१२-११ | श्री. अन्वय रंजन देसाई | कु. निवेदिता नीलेश विठोबा नायक |

## नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| १६-१२-११ | श्री. स्वप्नील सुभाषचंद्र कीर्तिकर | कु. करिश्मा मयुर अजिंक्य |
| १२-२-१२ | डॉ. अमित संजीव धुरंधर | कु. कॅथरीन गॅरी बर्श (आं.ज्ञातीय) |
| १२-२-१२ | कु. ग्रीष्मा उमेश किर्तीकर | श्री. महेश रमेश शेजवळ (आं.ज्ञातीय) |
| २१-१२-११ | श्री. अक्षय राजेश तळपदे | कु. श्रद्धा चंद्रदत्त प्रभु (आं.ज्ञातीय) |

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २३-१-१२ | श्री. विजयकुमार चंद्रकान्त नायक, | वय७३, | मुगभाट |
| १८-१-१२ | श्री. मदनसेन मनमोहनलाल सेंजित, | वय ८७, | मालाड |
| ९-२-१२ | श्री. रवींद्र शामसुंदर नवलकर, | वय ७७, | प्रभादेवी |
| ८-३-१२ | सौ. नीला शिवनंदन राव | वय ७६ | ठाणे |

*चुकीची दुरुस्ती:-* गतांकी मरण या सदरात कृपया १-१२-११ सुषमा जयवंत आनंदराव तळपदे असे वाचावे.

(पान ५ कॉलम ४ वरून)

पकोडा, टॉमेटो-शेवची भाजी, मसाला भेंडी असा मेनू असायचा.

सहल यशस्वी करून दिनांक २३ला सर्वजणी सुखरूपपणे मुंबईला परतल्या.

सदरहू सहलीचे आयोजन सौ. नूतन कीर्तिकर व सौ. स्वाती जयकर यांनी सांभाळले. यासाठी सौ. सुजाता व श्री. तुषार कीर्तिकर या दांपत्याचे बहुमोल मार्गदर्शन तसेच श्री. जयंत कीर्तिकर यांचे सहकार्य लाभले. गाडीतील जातानाचा भोजनाचा प्रश्न सौ. बिंबा नायक व येतानाचा भोजन प्रश्न सौ. वनिता दळवी या भगिनींनी सोडविला.

*

**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**
**Form IV (See Rule 8)**
**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**01-03-2012** **Suhasini Kirtikar**
Mumbai Signature of Publisher